# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


| तक्रार क्रमांक-१५८/२०२३/जळगांव<br>व्दितीय अपील क्र.-१६०/२०२२/जळगांव | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | |
| १. | श्री.गौरव हिम्मतराव पाटील,मु.दळवेल,पो,मोंढाळे,ता.पारोळा,जि.जळगांव | तक्रारदार |
| | विरूद्ध | |
| १. | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, दळवेल, ता. पारोळा, जि.जळगांव | उत्तरवादी क्र.१ |
| २. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पारोळा, ता. पारोळा, जि.जळगांव | उत्तरवादी क्र.२ |

(निर्णय दिनांक ०२/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक २६/१२/२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने व्दितीय अपील क्र.-१६०/२०२२/जळगांव संदर्भात दिनांक २२/०६/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २०/०९/२०२२ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, दळवेल, ता. पारोळा, जि.जळगांव यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतुद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन आयोगास असे निदर्शनास येते की, आयोगाने व्दितीय अपील क्र.-१६०/२०२२/जळगांव संदर्भात दिनांक २२/०६/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २०/०९/२०२२ अन्वये अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, दळवेल, ता. पारोळा, जि.जळगांव यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्र.-१६०/२०२२/जळगांव संदर्भात दिनांक २२/०६/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २०/०९/२०२२ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.उप मुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत, जिल्हा परीषद कार्यालय, जळगांव, ता.जि.जळगांव यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१५८/२०२३/जळगांव** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

तक्रार क्रमांक-**१५८/२०२३/जळगांव** /जावक क्र. ६५४०                    दिनांक- ०६/०८/२०२६

प्रत-माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद कार्यालय, जळगांव, ता.जि. जळगांव

२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत, जिल्हा परीषद कार्यालय, जळगांव, ता.जि. जळगांव

३) निवडनस्ती.